**Series RHB**

Code No. **8**
कोड नं.

Roll No.
रोल नं.

Candidates must write the Code on the title page of the answer-book.
परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।

- Please check that this question paper contains **4** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **8** questions.
- **Please write down the serial number of the question before attempting it.**
- 15 minutes time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer script during this period.
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ **4** हैं ।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें ।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में **8** प्रश्न हैं ।
- **कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें ।**
- इस प्रश्न-पत्र को पढ़ने के लिए 15 मिनट का समय दिया गया है । प्रश्न-पत्र का वितरण पूर्वाह्न में 10.15 बजे किया जाएगा । 10.15 बजे से 10.30 बजे तक छात्र केवल प्रश्न-पत्र को पढ़ेंगे और इस अवधि के दौरान वे उत्तर-पुस्तिका पर कोई उत्तर नहीं लिखेंगे ।

## SUMMATIVE ASSESSMENT – II

## संकलित परीक्षा – II

# MARATHI

# मराठी

*Time allowed : 3 hours*
*निर्धारित समय : 3 घण्टे*

*Maximum Marks : 80*
*अधिकतम अंक : 80*

## SECTION A – (Grammar)

**1.** पुढील वाक्यांचा काळ कंसांतील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहा : (कोणतीही ***पाच***) ६

(i) गेल्या महिन्यात पाऊस पडलाच नाही. (वर्तमानकाळ करा)

(ii) तू कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घेशील ? (वर्तमानकाळ करा)

(iii) ती फोनवर खूप वेळ बोलत आहे. (भूतकाळ करा)

(iv) उद्या मला पैसे मिळतील. (भूतकाळ करा)

(v) गेल्या महिन्यात मी दिल्लीला गेलो होतो. (भविष्यकाळ करा)

(vi) दुपारच्या वेळी नळाला पाणी येत नाही. (भविष्यकाळ करा)

## SECTION B – (Composition)

**2.** तुम्ही काढलेले रेल्वेचे तिकिट रद्द करायचे आहे; त्यासाठी प्रवासी एजंटला पत्र लिहा. 8

**किंवा**

तुम्ही खरेदी केलेली एक वस्तू खराब असल्यामुळे ती बदलून देण्याविषयी दुकानदाराला पत्र लिहा.

**3.** पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा : 7

आम्ही शाळेचा रस्ता सोडून लोकांच्या शेतातून दूरवर दिसणाऱ्या चिंचेच्या झाडाकडे मोर्चा वळवला. तिथे गेल्यावर सावलीत बसून चिंचा खाता येतील असा आमचा विचार होता. पण चिंचेला चिंचाच नव्हत्या. सावली होती, पण तिच्यात कुसळी गवत आणि चिबुक काटे होते. आम्ही जवळची दप्तरं चिंचेच्या खोडाजवळ ठेवली आणि 'आता कुठे थांबायला हवं' याचा विचार करीत बसलो. जवळच विहीर होती. दगडी खरीपाने बांधलेली होती. विहीर पाहून त्याला तहान लागली. कंपासपेटीतले सारे सामान त्याने दप्तरावर टाकले आणि ती मोकळी पेटी घेऊन तो अवघडत विहिरीत उतरला आणि कशीबशी कंपासपेटी पाण्यात बुडवली. मी वर सावधच होतो. ती घेतली, पाणी प्यायलो. तोही अवघडत पाणी प्यायला. वर आल्यावर त्याने कंपासपेटीत वर्तुळ, कंपास, पट्टी, इतर काचसामान भरलं आणि आम्ही पुन्हा येथून थोड्या दूरवर दिसणाऱ्या आंब्याच्या झाडाकडे गेलो. खेळून झाले, वाचून झाले, झोपा घेऊन झाले, तरी दिवस सरता सरेना. आता शाळेतील मुले काय करीत असतील, आता कोणाचा तास सुरू असेल, असा अंदाज आम्ही काढीत होतो. शेवटी न राहवून आम्ही घराच्या दिशेने चालू लागलो. तेही रमत गमत.

**4.** पुढील मुद्द्यांवरून गोष्ट लिहा : 10

एक राजा — एका डोळ्याने आंधळा — स्वतः चे चित्र बनवून घेण्याची इच्छा — चित्रकाराला पाचारण —हुबेहूब चित्र बनवण्याची आज्ञा — चित्रकारापुढे पेच —दरबारी लोकांत कुतूहल — ठरलेल्या दिवशी चित्र घेऊन चित्रकार दरबारात हजर — उत्सुकतेने चित्रावरील आवरण काढले जाते — राजेसाहेब एक डोळा मिटून सिंहावर बाणाचा नेम धरीत आहेत, असे चित्र — चित्रकाराची प्रशंसा.

## SECTION C – (Comprehension)

5. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

मोहीम फत्ते करून परत येताना पेशव्यांनी निझामाला गोदावरीच्या तीरावर असलेल्या मजरथ व टाकळी येथे विजयोत्सव साजरा करण्यासाठी येण्याचे निमंत्रण दिले. निझामाशी मैत्रीसंबंध राखण्याची माधवरावांची इच्छा होती. ही भेट 5 फेब्रुवारी 1766 ला झाली व तेथे उभयतांचा दहा दिवस मुक्काम होता. त्यात उत्सवी वातावरण होते. मेजवान्या, अहेरांची देवाणघेवाण, नाचगाणी, खेळ, तमाशे यांचा जल्लोष होता. दोघांच्याही मनात कुठलाही विकल्प नव्हता. वयाने निझामअली माधवरावांपेक्षा दहा वर्षांनी मोठा होता. या तरुण व तडफदार पेशव्यांच्या विचाराने, धोरणाने निझाम फारच प्रभावित झाला व दोघांच्यात सौहार्द निर्माण झाले, ते 1795 च्या खड्र्याच्या लढाईपर्यंत टिकले.

विजयोत्सवाचे ठिकाण होते टाकळी. ती राजेरायान यांची जहागीर होती. त्याप्रसंगी धोंडाजी शंकर व नानाजी शंकर हे उभय बंधू उपस्थित होते. एवढेच नव्हे तर दिलजमाईचा हा दिवाळसण घडवून आणण्यात व यशस्वी करण्यात त्यांचाच मोठा हात होता यात शंका नाही.

निझामअलीखाँ च्या दरबारात पाहता पाहता या बंधूंचे प्रस्थ बरेच वाढले. तीस वर्षे हैदराबाद राज्यात जी स्थिरता स्थापित झाली व प्रगती झाली त्यात उभयता बंधूंचा बराच मोठा वाटा होता. विशेष म्हणजे या बंधूंनी एकाच वेळी पेशवे सरकार व निझाम सरकार यांचा गाढ विश्वास संपादन केला होता. पेशव्यांनी या बंधूंना आपल्या राज्यात वेगवेगळ्या जहागिरी दिल्या. निझामाच्या दरबारात तर धोरणविषयक महत्त्वाची भूमिका त्यांच्या वाट्याला आली.

(अ) पुढील प्रश्नांच्या उत्तरांपैकी योग्य पर्याय निवडा : *4*

(i) उभयतांचा मुक्काम तेथे केव्हापर्यंत होता ?

(अ) 25 फेब्रुवारी 1766
(ब) 5 फेब्रुवारी 1766
(क) 15 फेब्रुवारी 1766
(ड) 20 फेब्रुवारी 1766

(ii) निझामअली आणि माधवराव पेशवे यांच्यातील संबंध कोणत्या प्रकारचे होते ?

(अ) शत्रुत्वाचे
(ब) चढाओढीचे
(क) विद्वेषाचे
(ड) मैत्रीचे

(ब) पुढील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : *6*

(i) धोंडाजी शंकर व नानाजी शंकर या दोघा बंधूंचे महत्त्व वर्णन करा.

(ii) विजयोत्सव कोठे व कसा साजरा झाला ?

## SECTION D – (Literature)

**6.** पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *15*

(i) हरिहर रावांनी कोणते कार्य केले ?

(ii) खाँ साहेबांनी भास्करची परीक्षा कोणत्या पद्धतीने घेतली ?

(iii) आडाच्या दिशेने चालू लागल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले ?

(iv) ज्योत्स्ना कदम यांच्या घरात कोणत्या अडचणी होत्या ?

**7.** (अ) कशाचा सोहळा साजरा करावा असे कवीला वाटते ? *2*

(i) काळोखाचा

(ii) भिंतींचा

(iii) प्रकाशाचा

(iv) पखालींचा

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *3*

(i) कवीच्या कोणकोणत्या उदात्त इच्छा 'तहान' या कवितेतून व्यक्त होताना दिसतात ?

(ii) श्रमिकांनी काय करावे असे कवीला वाटते ? का ?

(क) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचा संदर्भ सांगून त्यांतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा : *10*

(i) माणसा-माणसांमध्ये कोण बांधीतसे भिंती ?
माणसाला माणसाची आज का रे वाटे भीती ?

(ii) घाम गाळण्याचा असा
गड्या, तुझा माझा वसा

(iii) यावी लाविता कपाळी भक्तिभावनेने माती

**8.** (अ) वेळच्या वेळी हप्ते भरूनसुद्धा गणपा कर्जाच्या विळख्यात कसा अडकला ? *6*

(ब) बाईंचे लग्न ठरल्यावर प्रीतमने त्यांना काय देऊ केले ? का ? *4*